# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

आणि

महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना
(मान्यताप्राप्त)

यांच्यामधील

# एक वर्षाच्या मुदतवाढीचा
# कामगार करार

(दि.१.४.२००८ ते ३१.३.२००९)

समझोत्याचे संक्षेप लेख

औद्योगिक विवाद अधिनियम १९४७चे कलम २ (प) सहित कलम १८(१) औद्योगिक विवाद (मुंबई) नियम ६२ च्या अन्वये

## उभयपक्षकारांची नावे

| | | |
|---|---|---|
| नियोक्त्याचे (मालकाचे) प्रतिनिधी | : | श्री. ओम प्रकाश गुप्ता,<br>उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ |
| कामगारांचे प्रतिनिधी | : | श्री. हनुमंत ताटे,<br>जनरल सेक्रेटरी,<br>महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटना,<br>(मान्यताप्राप्त संघटना) |

## प्रकरणाचे संक्षिप्त कथन

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (व्यवस्थापन) आणि महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटना (मान्यताप्राप्त संघटना) यांच्यात दि. १९. १. २००५ रोजी झालेल्या कामगार कराराचा कालावधी दि. १. ४. २००४ ते ३१. ३. २००८ या चार आर्थिक वर्षांसाठी होता.

२००४-२००८च्या कामगार काराराची मुदत ३१. ३. २००८ रोजी संपत असून सदर कामगार करारान्वये देय होणारे आर्थिक फायदे दि. १. ४. २००८ पासून बंद होऊन कामगारांचे वेतन कमी होऊ नये म्हणून संचालक मंडळाने ठराव क्र. २००८:०३:०४ दिनांक १९. ३. २००८ खालील प्रमाणे ठराव पारीत केला.

**"सन २००४-२००८ या कामगार कराराची मुदत पुढील एक वर्षासाठी म्हणजेच दि.१.४.२००८दि.३१.३.२००९पर्यंत वाढविण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली. यापुढे महामंडळावर येणारा रू.२८कोटी अतिरिक्त आर्थिक भार महामंडळ सोसेल.सन २००४-२००८च्या कामगार कराराच्या पुढील एक वर्ष मुदतवाढीबाबत शासनास कळविण्यास व तसा शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली."**

याबाबतच्या प्रस्तावास शासनाने पत्रक्र. एसटीसी/३४०८/सीआर-१५३/परि-१ दि. २३. ४. ०८ अन्वये सदरच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

संचालक मंडळाने ठराव क्र. २००८:०३:०४ दिनांक १९. ३. २००८ अन्वये घेतलेला निर्णय व त्यास उपरोक्त पत्रान्वये शासनानी दिलेली मान्यता विचारात घेऊन उभयपक्षी समझोता करण्यात आला.

**********

| मागणी क्रमांक | मागणी | समझोता |
|---|---|---|
| १ | दि. १.४.२००४ ते ३१.३.२००८ या कालावधीच्या कामगार करारान्वये देय असलेल्या सोई सवलती व आर्थिक फायदे जे दि. ३१.३.२००८ नंतर बंद न करता नवीन कामगार करार होईपर्यंत तसेच पुढे चालू ठेवावेत. | (अ) दि. १.४.२००४ ते ३१.३.२००८ या कालावधीच्या कामगार करारान्वये देय असलेल्या सोई सवलती, तरतूदी व आर्थिक फायदे हे दि. ३१.३.२००८ पर्यंत देय होते ते पुढील एक वर्षाच्या कालावधीपर्यंत देय राहतील. तसेच दि. १.४.२००८ पासून होणारा (अस्तित्वात येणारा) नवीन कामगार करारान्वये देय होणाऱ्या रक्कमेतून सदरचे आर्थिक फायदे समायोजित करण्यात येईल.<br>(ब) "उत्पादकतेच्या निकषाच्या कामगार करारातील" तरतूदी ज्या दि. ३१.३.२००८ पर्यंत लागू होत्या त्या तरतूदी पुढील एक वर्षाच्या कालावधीपर्यंत लागू राहतील.<br>(क) "इतर मागण्यांच्या कामगार करारान्वये" देय असलेल्या सोई सवलती ज्या दि. ३१.३.२००८ पर्यंत लागू होत्या त्या सोई सवलती पुढील एक वर्षाच्या कालावधीपर्यंत देय राहतील. |

साक्षीदार

महाव्यवस्थापक (कं.व औ.सं)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळासाठी व त्यांच्यावतीने

(ओम प्रकाश गुप्ता)
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

कामगारांच्या वतीने मान्यताप्राप्त संघटनेचे प्रतिनिधी

(शिवाजीराव चव्हाण)
अध्यक्ष,
महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना

(हनुमंत ताटे)
जनरल सेक्रेटरी,
महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना

ठिकाण- मुंबई
दिनांक - २५ एप्रिल, २००८
C:\My Documents\Priyamble.doc